# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/10/2023 (रविवार) सायंकाळ

---

### लोखंडी तार चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील कोतवालबर्डी येथे दिनांक ०६/१०/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०७/१०/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— तुळशीराम माधोराव गुंजळ, वय ५४ वर्ष, रा. गावंडेनगर बाजारगाव हे शेती मालक मिलिंद कानडे यांचे मालकीचे मौजा कोतवालबर्डी याचे ०७ एकर मालकीचे शेत आहे. शेतीला लागुन लोखंडी ताराचे कम्पाउंड केले आहे. फिर्यादिचे ओळखीचे इसम नामे अशोकराव यांनी फिर्यादिला फोन करून सागीतले की कोणीतरी अज्ञात चोराने २४० फुट लोखंडी तार किंमती अंदाजे १००००/— हजार रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गंगाधर ठाकरे ब. नं. १६५९मो. नं. ९९२३९०८३८२ हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा भूगाव व सावली येथे दिनांक ०५/१०/२०२३ चे २१.३५ वा. २३.१० वा. दरम्यान फिर्यादी नामे— देवानंद ज्ञानेश्वर देउळकर, वय २७ वर्ष, रा. गोपाळकृष्ण लॉन वाठोडा लेआउट नागपूर हा रिलायन्स जिओ मध्ये टेक्नीशियन पदावर आहे. यांचेकडे कामठी तालुका येतो. व मोबाईलच्या टॉवरचे काम करतो. दि. ०५/१०/२०२३ रोजी रात्री ०९/३५ वा. दरम्यान भूगाव येथून ५ जी नेटवर्क बंद पडल्याचा कॉल आला. त्यावरून बंद पडलेल्या टॉवरच्या ठिकाणी ११/१० वा. पोहचले व तेथे जावून पाहिले असता त्या ठिकाणी टॉवरची ५ जी बीबीयू मशीन ओडीसी ओपन बॉक्समधील ५ जी बीबीयू मशीन दिसून आली नाही. व काही वेळात ओएमसीआर नागपूर येथून कॉल आला व सांगितले की ५ जी सावली येथिल ५ जी नेटवर्क बंद पडले तेव्हा तिथे लगेच सावळी येथे पोहोचले रात्री ११/०० वा. जावून बघितले असता ५ जी बीबीयू मशीन दिसून आली नाही. किंमती १०,०००/—रू. प्रमाणे दोन मशीन ५ जी बीबीयू मशीन किंमती एकुण २०,०००/—रू.चा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भगवान चांदेवार मो. नं. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर